# कर्मवीर शंकरराव काळे सह.साखर कारखाना लि,गौतमनगर.
# पो.कोळपेवाडी ता.कोपरगाव जि.अहिल्यानगर.

**जा.क्र.ऊस विकास/३४००** **दिनांक-१७/१२/२०२५**

## --परिपत्रक --

**'पुर्वहंगामी व खोडवा ऊस जोपासणी धोरण'**

**लागवड हंगाम २०२५-२०२६(गळीत हंगाम २०२६-२७)**

कारखाना कार्यक्षेत्रात हंगामनिहाय ऊस लागवडीचे धोरण घेण्यात येते.त्यास अनुसरुन लागवड हंगाम २०२५-२६ (गाळप हंगाम २०२६-२७) करीता मा.संचालक मंडळाने खालीलप्रमाणे पुर्वहंगामी ऊस लागवड व खोडवा जोपासणीचे धोरण घेतलेले आहे.

| **पुर्वहंगामी ऊस लागवड व खोडवा जोपासणी धोरण-:** | | | |
|---|---|---|---|
| **१.** | **कालावधी व शिफारशीत ऊस जाती-:** | | |
| | **लागवड हंगाम** | **लागवड कालावधी** | **शिफारशीत ऊस जाती** |
| | **पुर्वहंगामी** | १ ऑक्टोबर २०२५<br>ते<br>३१ डिसेंबर २०२५ | को -८६०३२,को.एम.०२६५,को-व्ही.एस.आय.१२१२१(०८००५),<br>को-व्ही.एस.आय-०३१०२,को.सी.६७१,फुले ऊस १५०१२,<br>फुले ऊस १३००७,फुले ऊस १५००६, एम.एस १०००१,<br>को-व्ही.एस.आय.१८१२१ |
| | **खोडवा -:** | गळीत हंगाम २०२५-२६ मध्ये तुटलेल्या सर्व उसाचे खोडवे व निडवे | |

**२. लागवड पध्दत** -: एकरी ऊस उत्पादन वाढीकरीता ऊस लागवड ही ४ ते ५ फुट रुंद सरीमध्ये करावी.

**३. ऊस बेणे** -: पुर्वहंगामी ऊस लागवडीकरीता ऊस बेणेची गरज असणाऱ्या शेतकऱ्यांना कारखाना हमीवर रक्कम रु.८०००/-पर्यत एकरी ऊस बेण्याचा उधारीने पुरवठा करण्यात येईल.तसेच कार्यक्षेत्रातील ऊस बेणेचा खरेदी विक्रीचा दर ऊस उत्पादकांनी परस्पर ठरवावयाचा आहे.परंतु कारखान्याची बेणे विक्री चिठ्ठी असल्याशिवाय परस्पर बेणे विक्री करु नये.

**४. ऊस रोपे** -: कारखाना कार्यक्षेत्रात जे शेतकरी पुर्वहंगामी ऊसाची लागवड ही ऊस रोपांपासुन करतील त्यांना प्रति रोप रु.१/- याप्रमाणे बुकींग रक्कम रोख भरावी लागेल व प्रती रोप रु.१/- कारखान्यामार्फत अनुदान सदर ऊस गळीतास आल्यानंतर देण्यात येईल.आणि उर्वरीत रक्कम ऊस उत्पादकांचे नावे टाकण्यात येईल.ऊस रोपांचा पुरवठा कारखान्याने नियुक्त केलेल्या नर्सरीमधुन करण्यात येईल.जे ऊस उत्पादक ऊस रोपांपासुन ऊस लागवड करतील त्यांची ऊस नोंद तारीख एक महिना अगोदर ग्राह्य धरण्यात येईल. पुर्वहंगामी ऊस रोप बुकींग करण्याचा कालावधी २५ डिंसेबर २०२५ पर्यत राहील.तसेच ऊस रोपांपासुन होणारी पुर्वहंगामी लागवड ही २५ जानेवारी २०२६ पर्यतच ग्राह्य धरण्यात येईल.त्यानंतर रोपांपासुन उशिरा झालेली ऊस नोंद सुरु मध्ये धरण्यात येईल.**(रोप मर्यादा एकरी ५००० पर्यत राहील )**

**५. रासायनिक खते व कर्मवीर बायोअर्थ** -: २ गोणी युरीया व २ गोणी इफको(१०:२६:२६) अथवा तत्सम खते तसेच ठिबक सिंचनावरील ऊस पिकास विद्राव्य खतांचा उधारीने उपलब्धतेनुसार पुरवठा करण्यात येईल(रु.३५००/-रक्कमेपर्यत प्रती एकर)कर्मवीर बायोअर्थ ची प्रती गोणी किमंत रु.२५०/-(जी.एस.टी) आहे.कर्मवीर बायोअर्थ रोखीने खरेदी करावयाची झाल्यास संपुर्ण रक्कम रोख भरणा कारखान्याकडे करावा लागेल तसेच उधारीने खरेदी करावयाचे असल्यास ऊस उत्पादकांना प्रती गोणी ॲडव्हान्स रक्कम रु.५०/-

**मागील पानावर/-**

रोख भरणा कारखान्याकडे करावा लागेल.त्यासाठी ऊसाची नोंद विचारात घेतली जाईल.उर्वरीत रक्कमेची वसुली ही कारखान्याचे प्रचलित धोरणाप्रमाणे सव्याज(१२.५%) ऊस उत्पादकांचे गळीतास येणाऱ्या ऊस बिलातुन वसुल करण्यात येईल.

६ **तणनाशके** -: ऊस पिकातील तण नियंत्रणाकरीता कारखान्यामार्फत मेट्रीब्युझीन ७०% WP चा धोरणाप्रमाणे उधारीने उपलब्धतेनुसार पुरवठा करण्यात येईल.

७ **दुय्यम अन्नद्रव्ये** -: ऊस उत्पादकांना व्ही.एस.आय निर्मित सुक्ष्म अन्नद्रव्ययुक्त खते,द्रवरुप जैविक खते,पोषके व जैविक किटकनाशके यांचा उपलब्धतेनुसार रोख व उधारीने स्वरुपात वाटप करण्यात येईल.

८. **नियम व अटी** -:

**८.१** रासायनियक खते,तणनाशके,ऊस रोपे,कर्मवीर बायोअर्थ इत्यादी वस्तुरुप सहाय्याची त्याचप्रमाणे बेणे ॲडव्हान्स रक्कमेची वसुली ही कारखान्याचे प्रचलित धोरणाप्रमाणे सव्याज (१२.५%) ऊस उत्पादकांचे ऊस बिलातुन किंवा सदरचा ऊस कोणत्याही कारणास्तव गळीतास न आल्यास एकत्रीत कुटुंबातील देय पेंमेट मधुन अथवा जामिनदाराच्या ऊस पेंमेट मधुन सव्याज वसुल करण्यात येईल.

**८.२** पुर्वहंगामी ऊस लागवडीची नोंदणी लागवड झाल्यांनतर ३ दिवसांच्या आत करणे बंधनकारक राहील.याशिवाय एकत्रित कुटुंबातील संपुर्ण ऊस क्षेत्राची नोंद कारखान्याकडे करणे आवश्यक राहील.एकदा केलेली ऊस नोंद कुठल्याही परिस्थितीत बदलण्यात येणार नाही.

**८.३** सभासंदाचे अंतर्गत घरगुती शेत जमिनीच्या प्रश्नामुळे निर्माण होणारे वाद व त्यामुळे नुकसानीची जबाबदारी संबधित सभासदांची राहील.तसेच ज्या ऊस उत्पादक सभासदांच्या ऊस नोंद केलेल्या क्षेत्राला रस्ता नाही.अशी ऊस उत्पादक सभासदांनी स्वता:च्या जबाबदारीवर ऊस तोड करुन स्वत:च्या वाहनाने कारखान्यावर पोहच करावा.रस्ताअभावी ऊस उभा राहिल्यास त्यास कारखाना जबाबदार राहणार नाही.

**८.४** कारखान्याच्या ऊस विकास योजनेचा लाभ घेण्यासाठी कारखाना बाकी विचारात घेतली जाईल.ज्या ऊस उत्पादक सभासदांची थकबाकी असेल अशा सभासदांना ऊस विकास योजनेचा लाभ दिला जाणार नाही.तसेच एकत्रित कुटुंबातील कारखाना थकबाकी ही प्राधान्याने ऊस गाळपासआल्यानंतर ऊस बिलातुन अग्रहक्काने वसुल केली जाईल.

**८.५** कारखान्यामार्फत रासायनिक खते,तणनाशके किंवा इतर वस्तुरुप सहाय्य घेतेवेळी स्वत:चे ओळखपत्र दाखविणे आवश्यक आहे.तसेच कुटुंबातील इतर व्यक्तीच्या नावे रासायनिक खते इत्यादी घेण्यासाठी संबधित व्यक्तीचे संमतीपत्र बंधनकारक राहील.

वरील नियम व अटी ह्या प्राथमिक स्वरुपाच्या असुन त्यामध्ये वाढ अथवा सुधारणा करण्याचा अधिकार मा.संचालक मंडळाने राखुन ठेवलेला आहे.

तरी सर्व ऊस उत्पादकांना विनंती करण्यात येते की,लागवड हंगाम २०२५-२०२६ करीता जास्तीत जास्त पुर्वहंगामी ऊस लागवडी व खोडवा ऊस जोपासणी कराव्यात.कार्यक्षेत्रातुन ऊस उपलब्धता वाढविण्याकरीता सहकार्य करावे,ही विनंती.

कळावे,

**आपला विश्वासु,**

**एस.एस.बोरनारे**
**कार्यकारी संचालक**